**प्रस्तावना :- भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेसाठी प्रसिद्ध करण्यात आलेली निविदा सुचना क्र.४ टेंडर क्र.१०८२१६७ या निविदेस प्राप्त झालेले निविदाकार व निविदाकारांनी सादर केलेल्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.**

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा दैनंदिन १०० टक्के कचरा संकलन व वहन करणेसाठी विभागामार्फत ई-निविदा सुचना क्र.०४ टेंडर क्र.१०८२१६७ मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दिलेल्या दि.०६/०९/२०२४ रोजीच्या मान्यतेनुसार दि.०७/०९/२०२४ ते दि.१८/०९/२०२४ या कालावधी करिता http://mahatender.gov.inया संकेतस्थळावरप्रसिध्द करण्यात आली असता सदर कालावधीत सण, उत्सव व इतर कारणास्तव मा. प्रशासक तथा आयुक्त सो.यांनी दि.१६/०९/२०२४ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार सदर निविदेस दि.१९/०९/२०२४ ते दि.२५/०९/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. याकामी सदर निविदेस१ निविदाकार प्राप्त झाले असल्याचे संगणक विभागाच्या दि.२५/०९/२०२४ रोजीच्या अहवालात निदर्शनास आले होते. त्याअनुषंगाने आत्यावश्यक सेवा व विधासभा निवडणूक २०२४ ची आचारसंहिता लागू होण्याची शक्यता पाहता सदर निविदेस दि.२६/०९/२०२४ ते ३०/०९/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असता संगणक विभागाचे दि.३०/०९/२०२४ रोजीचे प्राप्त अहवालानुसार सदर निविदेस ५ निविदाकार प्राप्त झाले होते.

प्रभाग समिती क्र.०२ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदा सुचना क्र.०४ टेंडर क्र.१०८२१६७ साठी प्राप्त ५ निविदाकार यांनी निविदेच्या अटीं शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्ततेची तपासणी नियुक्त तांत्रिक सल्लागार मे. ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, नाशिक यांचे मार्फत करण्यात आली असुन नियुक्त तांत्रिक सल्लागार यांनी दि.०७/१०/२०२४ रोजी दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने मा. निविदा समितीने दिलेल्या मान्यतेनुसार प्राप्त ५ निविदाकारांपैकी ३ निविदाकार पात्र ठरविण्यात आले असता महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्रमांक: भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ मधील प्रकरण-४ मुद्दा क्र.४.४.३.१ मधील तरतुदीनुसार पात्र ३ निविदाकार यांचे आर्थिक बोलीचा लिफाफा-२ (फायनानशियल) खुले करण्यात आले असता खालील तक्त्या प्रमाणे त्यांनी दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | प्राप्त निविदाकाराचे नाव | तांत्रिक दृष्ट्या पात्र / अपात्र | सादर केलेला एकुण खर्च | प्राप्त लघुत्तम दर (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| १ | **मे. डिम्पल एंटरप्रायजेस** | पात्र | **रु.४८,७८,५६६/-** | **L1(-19.83%)** |
| २ | मे. चव्हाण एंटरप्रायजेस | पात्र | रु.५५,३५,५३०/- | L2(-9.36%) |
| ३ | मे. साईबाबा एंटरप्रायजेस | पात्र | रु.६०,७३,८३४/- | L3(-0.18%) |

वरील तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.०२ च्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी मे. डिम्पल एंटरप्रायजेस, भिवंडी यांनी सर्वात कमी दराची निविदा रक्कम रु.४८,७८,५६६/- मात्र भरली असुन सदरचे प्राप्त दर हे निविदेतील अंदाजपत्रकिय रक्कमेच्या रु.१२,०६,४३४/- इतकी कमी भरली असुन निविदा अटी शर्तीनुसार नियुक्त तांत्रिक सल्लागार यांनी ३ वर्षासाठी होणाऱ्या खर्चाचा अहवाल सादर केला असुन सदरचा खर्च खालील तक्त्या प्रमाणे आहे.

**Annexture –I ZONE -2**

| Sr No. | Detail | 1st year | 2nd Year | 3rd Year |
|---|---|---|---|---|
| 1 | **Estimated Project Cost** | 60,85,000.00 | | |
| 2 | **L1 Cost** | 48,78,566.00 | 51,22,494.30 | 53,78,619.02 |
| 3 | **Tender % below** | 19.83% | 19.83% | 19.83% |
| 4 | **Total Project cost for 1st year** | 5,85,42,792.00 | 6,14,69,931.60 | 6,45,43,428.18 |
| 5 | **Performance security 3 year Bank Garrenty 3%** | 65,71,000/- | - | - |
| 6 | **Additional Security Deposit in %** | 15.66% | 15.66% | 15.66% |
| 7 | **Additional Security Deposit in** | 91,67,801.23 | 96,26,191.29 | 1,01,07,500/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Rs. | | | |
| 8 | **Total Security Deposit** | **1,57,38,801/-** | **96,26,191/-** | **1,01,07,500/-** |
| 9 | **Stamp Duty for Agreement 3 year** | **1,83,200/-** | **-** | **-** |

उपरोक्त तक्त्याच्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चास मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.परंतू मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी होणाऱ्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणेकामी प्रशासकिय ठराव घेणेस विनंती आहे. तसेच संबंधित संस्थेस कार्यादेश देणेकामी मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.३०/११/२०२४ रोजी मान्यता दिली असुन संबंधित संस्थेस कार्यादेश निर्गमीत करुन दि.२१/१२/२०२४ रोजी पासुन घनकचरा व्यवस्थापनाचे काम सुरु करुन होणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेस विनंती आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** ७०३ **दिनांक** २०/१२/२०२४

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.०२ च्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी मे. डिम्पल एंटरप्रायजेस, भिवंडी यांनी रु.४८,७८,५६६/- असे सर्वात कमी दराची निविदा सादर केली असुन सर्वात कमी दर सादर केलेले निविदाकार यांना व त्यांनी सादर केलेल्या खर्चास व नियुक्त तांत्रिक सल्लागार मे. ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, नाशिक यांनी प्राप्त दराच्या अनुषंगाने विभागाने प्रस्तावनेत प्रस्तावित केलेप्रमाणे दि.०१/१२/२०२४ रोजी पासुन तीन वर्षासाठी होणाऱ्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि, दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेकामी मनपाच्या http://mahatender.gov.inया संकेतस्थळावरई-निविदा सुचना क्र.०४ टेंडर क्र.१०८२१६७ मध्ये मे. डिम्पल एंटरप्रायजेस, भिवंडी यांनी रु.४८,७८,५६६/- सर्वात कमी दर सादर केले असुन मनपाच्या अंदाजपत्रकिय रक्कमेच्या रु.१२,०६,४३४/- कमी दराच्या (रु.४८,७८,५६६/-) निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) नुसार मे. डिम्पल एंटरप्रायजेस, भिवंडी या ठेकेदार संस्थेसमवेत करारनामा करुन दि.२१/१२/२०२४ रोजी पासुन घनकचरा व्यवस्थापन कामाचे कार्यादेश देणे कामी व आवश्यकतेनुसार बदल करणेकामी अधिकार राखुन ठेवुन यासाठी उपरोक्त प्रस्तावित प्रमाणे दि.२१/१२/२०२४ रोजी पासुन ३ वर्षाकरिता होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

O/C HR

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग

**प्रस्तावना-**

**विषय-अग्निशमन विभागाला आगीच्या व रेस्कयु वर्दीवर काम करणेकरिता एक नग रेस्क्यु टेंडर वाहनाचे फॅब्रिकेशनसहित पुरवठा करणेबाबत.**

अग्निशमन विभागाला आगीच्या व रेस्कयु वर्दीवर काम करणेकरिता रेस्क्यु टेंडर वाहनांचे DESIGN, CONSTRUCTION, FABRICATION, ERECTION, TESTING AND COMMISSIONING करणेबाबतची निविदा सुचना क्र.२ सन २०२४-२५ ई निविदा क्रं. ११४३१३ चे तांत्रिक कागदपत्रे (टेकनिकल बीड) दिनांक- ०५/११/२०२४ रोजी दु.४.०० वाजता उघडण्यात आले. सदर निविदेच्या छाननी अंती तीन निविदा निविदासमितीने पात्र ठरविल्या व निविदेतील पात्र निविदाकारांची आर्थीक (फायनांशियल बिड) (टी-२) दिनांक- १०/१२/२०२४ रोजी दुपारी ०४.०० वा उघडण्यात आलेले असुन निविदेच्या तौलनिक तत्कानुसार रेस्क्यु टेंडर - ०१ नग फॅब्रिकेशनसह पुरवठा करणेकामी मे. निधी इंटरप्रायजेस, मुंबई यांची सर्वात कमी दराची निविदा रु. ६,७५,१०,०००/- (अक्षरी- सहा कोटी पंचाहत्तर लाख दहा हजार रुपए मात्र) इतक्या रक्कमेची होत आहे.

मे. निधी इंटरप्रायजेस,मुंबई यांची सर्वात कमी दराची निविदा रु. ६,७५,१०,०००/- (अक्षरी- सहा कोटी पंचाहत्तर लाख दहा हजार रुपए मात्र) इतक्या रकमेची असल्याने त्यास मा.उपआयुक्त (मुख्या),मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व विधी अधिकारी यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक- १९/१२/२०२४ रोजी पुर्व मान्यता दिलेली आहे. त्यास मंजुरी देण्याचा प्रस्ताव.

**ठराव क्रं.** 1008 **दिनांक-**20/12/2024

अग्निशमन विभागाला आगीच्या व रेस्कयु वर्दीवर काम करणेकरिता एक नग रेस्क्यु टेंडर वाहनांचे DESIGN, CONSTRUCTION, FABRICATION, ERECTION, TESTING AND COMMISSIONING मे. निधी इंटरप्रायजेस, मुंबई यांच्या कडुन करुन घेणेकरिता रु. ६,७५,१०,०००/- (अक्षरी- सहा कोटी पंचाहत्तर लाख दहा हजार रुपए मात्र) च्या खर्चास महाराष्ट्र शासन , नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र ७१/नवि १४, दिनांक ०९ नोव्हेबंर २०२० अन्वये महाराष्ट् महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९ दिनांक-०२/११/२०२० अन्वये अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) मधील तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मंजुरी देत असनु मे. निधी इंटरप्रायजेस,मुंबई यांचे सोबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग

**प्रस्तावना-**

**विषय- अग्निशमन विभागाला आगीच्या व रेस्कयु वर्दीवर काम करणेकरिता विविध प्रकारच्या अग्निशमन वाहनांचे फॅब्रिकेशनसहित पुरवठा करणेबाबत.**

अग्निशमन विभागाला आगीच्या व रेस्कयु वर्दीवर काम करणेकरिता विविध प्रकारच्या अग्निशमन वाहनांचे DESIGN, CONSTRUCTION, FABRICATION, ERECTION, TESTING AND COMMISSIONING करणेबाबतची निविदा सुचना क्र.३ सन २०२४-२५ ई निविदा क्रं. ११४३४४ या निविदेची तांत्रिक कागदपत्रे (टेकनिकल बीड) दिनांक-०५/११/२०२४ रोजी दु.४.०० वाजता उघडण्यात आले. सदर निविदेच्या छाननी अंती तीन निविदा निविदासमितीने पात्र ठरविल्या व निविदेतील पात्र निविदाकारांची आर्थीक (फायनांशियल बिड) (टी-२) दिनांक- १०/१२/२०२४ रोजी दुपारी ०४.०० वा उघडण्यात आलेले असुन निविदेच्या तौलनिक तत्कानुसार निविदा क्रं. ११४३४४ मधील मिनी फायर टेंडर-०५ नग, फायर टेंडर-०५ नग, फोम टेंडर-०४ नग व वॉटर ब्राउझर-०१ नग अशी एकुण १५ नग विविध प्रकारची अग्निशमन वाहने फॅब्रिकेशनसह पुरवठा करणेकामी मे. निधी इंटरप्रायजेस, मुंबई यांची सर्वात कमी दराची निविदा रु. २५,५१,५९,५५२/- (अक्षरी- पंचवीस कोटी एकावण्ण लाख एकोणसाठ हजार पाचशे बावण्ण रु. मात्र) इतक्या रक्कमेची होत आहे.

मे. निधी इंटरप्रायजेस,मुंबई यांची सर्वात कमी दराची निविदा रु. २५,५१,५९,५५२/- (अक्षरी- पंचवीस कोटी एकावण्ण लाख एकोणसाठ हजार पाचशे बावण्ण रु. मात्र) इतक्या रकमेची असल्याने त्यास मा.उपआयुक्त (मुख्या),मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व विधी अधिकारी यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक- १९/१२/२०२४ रोजी पुर्व मान्यता दिलेली आहे. त्यास मंजुरी देण्याचा प्रस्ताव.

**ठराव क्रं.** ७०५ **दिनांक-** 20/12/2024

अग्निशमन विभागाला आगीच्या व रेस्कयु वर्दीवर काम करणेकरिता मिनी फायर टेंडर-०५ नग, फायर टेंडर-०५ नग, फोम टेंडर-०४ नग व वॉटर ब्राउझर-०१ नग अशी एकुण १५ नग विविध प्रकारची अग्निशमन वाहनांचे DESIGN, CONSTRUCTION, FABRICATION, ERECTION, TESTING AND COMMISSIONING (फॅब्रिकेशनसह पुरवठा) मे. निधी इंटरप्रायजेस, मुंबई यांच्या कडुन करुन घेणेकरिता रु. २५,५१,५९,५५२/- (अक्षरी- पंचवीस कोटी एकावण्ण लाख एकोणसाठ हजार पाचशे बावण्ण रु. मात्र) च्या खर्चास महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र ७१/नवि १४, दिनांक ०९ नोव्हेंबर २०२० अन्वये महाराष्ट् महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९ दिनांक-०२/११/२०२० अन्वये अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) मधील तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मंजुरी देत असनु मे. निधी इंटरप्रायजेस,मुंबई यांचे सोबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी**

012